जा.क्र.: ना जि सु र मं / अध्यक्ष /वेतनवाढ / वि. भ. २०१८ /.......६७८
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दुरभाष क्र : (०२५३) २५९००३१.
दिनांक : ~~२७ फेब्रुवारी २०१८~~ 05 MAR 2018

# आदेश

**विषय :** **सुरक्षा रक्षक मंडळातील सुट प्राप्त नोंदीत सुरक्षा रक्षक / सुरक्षा अधिकारी यांच्या वेतनात व इतर भत्यात दि. ०१/०१/२०१८ पासून करण्यात येणारी सुधारणा.**

**संदर्भ :** १. शासन आदेश क्र. युडब्ल्युए - २०१४ / प्र. क्र. ५८३ / काम. ५. दि. ०७.११.२०१७.
२. मंडळातील नोंदीत कार्यरत सुरक्षा रक्षकांचे वेतन, भत्ते व इतर सेवा शर्ती पुनर्निधारीत करण्याबाबतचे मंडळाचे दि. ०६.०४.२०१७ रोजीचे पत्र.
३. क्र. सुरक्षा / नाशिक / २०१८ / कार्या - १४ /११० सहायक कामगार आयुक्त (माथडी), मुंबई यांचे दि. १५.०२.२०१८ रोजीचे पत्र.

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुटप्राप्त सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ च्या कलम ६ नुसार एक सदस्यीय मंडळाच्या अधिकाराचा वापर करुन तसेच महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ मधील कलम ३ (२) (ड) व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना २००२ मधील खंड ३० अन्वये नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत सुटप्राप्त मालकाकडे काम करणाऱ्या सुरक्षा रक्षकांचे वेतन पुनर्निधारीत करुन त्यांच्या मुळवेतनात रु. १०००/- वाढ करुन तसेच सुटप्राप्त सुरक्षा रक्षकांना नव्याने शैक्षणिक भत्ता म्हणून रु. ३००/- इतकी सुधारीत दराने वेतनवाढ लागू करण्यात येत आहे. सदरहू वेतनवाढ दि. १ जानेवारी २०१८ पासून अनुज्ञेय राहील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. १ जानेवारी २०१८ पासून सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ. क्र. | पद | मुळवेतन | विषेश भत्ता / महागाई भत्ता | घरभाडे भत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा रक्षक | ६००० | ३५६४ | ४७८ | १३०० | २९४ | ३०० | ११९३६ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | ६४०० | ३५६४ | ४९८ | १३०० | २९४ | ३०० | १२३५६ |
| .३ | सुरक्षा पर्यवेक्षक | ६८०० | ३५६४ | ५१८ | १३०० | २९४ | ३०० | १२७७६ |

* किमान वेतन = मुळवेतन + विषेश भत्ता / महागाई भत्ता

सुट प्राप्त एजन्सी मालकांनी सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांना पुढील प्रमाणे इतर फायदे /लाभ देणे बंधन कारक आहे. **१) सानुग्रह अनुदान :** किमान वेतनाच्या १०% **२) उपदान :** किमान वेतनाच्या ४ % **३) भरपगारी रजा :** किमान वेतनाच्या ६ % **४) भरपगारी सुट्टी :** किमान वेतनाच्या १ %.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षक / सुरक्षा पर्यवेक्षक/ सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावरील ३% लेव्ही दरमहा ५ तारखेपर्यंत मंडळात आर.टी.जी.एस. / DD द्वारे / धनादेशा द्वारे जमा करणे बंधन कारक आहे. सबब, मंडळातील सर्व नोंदीत सुट प्राप्त एजन्सी मालकांना या द्वारे असे सुचित करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सुरक्षा रक्षक/ सुरक्षा पर्यवेक्षक /सुरक्षा अधिकारी यांना दि. ०१/०१/२०१८ पासून सुधारीत वाढीव वेतनासह व विषेश भत्ता / महागाई भत्याच्या फरकासह रक्कम विनाविलंब अदा करावी.**

05/3/18
(जी. जे. दाभाडे)
कामगार उप आयुक्त व अध्यक्ष
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.

प्रति,

**Bombay Intelligence Security (I) Ltd.**
2 & 3, Silver Valley CHS, Opp. Nehru Nagar,
Nasik-Pune Road, Nasik - 422 101.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ महाराष्ट्र नाशिक